८०८-१९

विना अनुदान
उर्दू माध्यम
इ. ८ वी व ९ वी च्या वर्गास जून -२००९ पासून परवानगी

जा.क्र.माध्य. /३/१२/ /नमाशा /पुवि /२००९-१०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१
यांचे कार्यालय
दिनांक : 10 MAR 2010

प्रति

सचिव,
अलमनार एज्यु. सोसा. गट नं. ७६९
आझादनगर, पवारवस्ती, कुदळवाडी, चिखली,
पुणे

विषय :- सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत. . .

संदर्भ :- १) शासन पत्र क्रमांक नमाशा-२००९/(४९६/०९)/माशि-१, दिनांक २७.८.२००९
२) या कार्यालयाचे विचाराधीन पत्र क्रमांक माध्य.३/१२/पुणे-२/नमाशा/पुवि/०९-१०, दिनांक ७.१०.२००९
३) शिक्षणाधिकारी (माध्य.) जि. प. पुणे यांचे पत्र क्र. जि.प.माध्य./४३५५/नमाशा/प./१०, दि. ३०.१.२०१०

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घेतलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन खालील दर्शविलेल्या ठिकाणी इ. व माध्यमातून जून २००९ पासून विनाअनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा संहितेनुसार. आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१) या नविन माध्यमिक शाळांना (इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त) शासनाने विहित केलेल्या सुधारित मुल्यांकन निकषानुसार व अनुदान सुत्रानुसारच भविष्यात अनुदान अनुज्ञेय राहील.
२) सदर माध्यमिक शाळांना वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे
३) सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधनकारक असणे आवश्यक आहे.
४) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडुन कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्ट्या मागालेल्या विद्यार्थ्यांसाठी (ई.बी.सी.) फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.
५) जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यात येऊ नये.
६) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपीटेशन फीज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येऊ नये.
७) माध्यमिक शाळा संहिता व खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.
८) संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यांत येईल.
९) शिक्षक / कर्मचारी संच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मंजूर करुन देण्यात येईल.
१०) माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यांत येईल.
११) शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधांसह ठेवण्यात येतील.
१२) माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये कार्यकारी गट समिती सभेच्या पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.
१३) माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२ (१७) अन्वये शाळेत पालक-शिक्षक संघाची स्थापना सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे.
१४) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. एस.एस.एन. २१०३/(५०/०३) माशि-२, दि. २७ मे, २००३ मधील अटी व शर्ती कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.
१५) जनहितार्थ या. क्र. ४८३/०४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एपिल, २००९ रोजी "शाळांमध्ये अग्निसुरक्षा राबविणे" संदर्भात दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

जनहितार्थ या. क्र. ४८३/०४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एपिल, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची / अटींची पूर्तता करण्याचे अटीवरच सदर परवानगी देण्यात येत आहे. खालील बाबींबाबतचा तपासणी अहवाल प्रथम मान्यता प्रस्तावाच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील.

१) शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रण बसविण्यात यावी
२) शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येऊ नयेत.
३) शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
४) सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याबाबत तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील.

(कृ. मा. प.)

मुख्याध्यापक
अलमनार हायस्कूल
चिखली, ता. हवेली, जि. पुणे

५) प्रत्येक इमारतीच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building Code of India) काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी / कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १.-शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि.-४, दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२.-संचालनालयाचं पत्र क्र. संकीर्ण/२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दि. २४ सप्टेंबर,२००९

**वरील बाबींची पूर्तता केल्या खेरीज आपल्या प्रस्तावाचा प्रथम मान्यतेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.**

**इतर अटी :-**

१) संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्व अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३) सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखादी शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शास ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबीत नाही.

५) सदर संस्थांमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

वरील बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरुद्धात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्य समजण्यात यावे.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | अलमनार एज्यु. सोसा. गट नं. ७६९ आझादनगर, पवारवस्ती, कुदळवाडी, चिखली, पुणे | अलमनार हायस्कूल, चिखली, ता. हवेली | आठवी व नववी (कार्यरत वर्ग) | उर्दू |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३, १ अनुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यता करिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना म देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

(बाळासाहेब ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

स्थळप्रतीवर मा. शिउसं यांची सही असे.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी

१) शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.

त्यांना वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देऊन पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरित या का पाठवावा. तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहारांची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्याविषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. स माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तपासणी करुन अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

प्रत माहितीसाठी सविनय सादर.

२) मा. उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

३) मा. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर.

४) निवड नस्ती

मुख्याध्यापक
अलमनार हायस्कुल
चिखली, ता. हवेली, जि. पुणे

मुख्याध्यापक
अलमनार हायस्कुल
चिखली, ता. हवेली, जि. पुणे